# जयंती, पंचगंगेची पुण्यतिथी घालणार का?

## डॉ. विश्वंभर चौधरी : वसुंधरा फिल्म फेस्टिव्हलचा पडदा उघडला

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : कोणत्याही 'ग्लोबल' पर्यावरणीय प्रश्नांवर 'लोकल' उत्तरेच शोधावी लागतात. एकीकडे विकासाच्या गप्पा मारताना दुसरीकडे जयंती नाला, पंचगंगा नदीची पुण्यतिथी घालायची वेळ आली आहे. आता तरी स्वतःलाच खडा सवाल विचारा आणि वसुंधरा फिल्म फेस्टिव्हलच्या निमित्ताने स्वतः पहिले पर्यावरणपूरक पाऊल उचला, असे आवाहन पर्यावरणतज्ज्ञ डॉ. विश्वंभर चौधरी यांनी केले. येथील पाचव्या किर्लोस्कर वसुंधरा फिल्म फेस्टिव्हलला आज त्यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रारंभ झाला. त्यावेळी ते बोलत होते.

दरम्यान, सलग चार दिवस महोत्सव सुरू राहणार असून चित्रपट, लघुपटांसह विविध पर्यावरणपूरक उपक्रमांतून 'प्रयत्न छोटा, बदल मोठा' हा संदेश पोचवला जाणार आहे. शाहू स्मारक भवनात महोत्सव सुरू असून कलादालनात छायाचित्र व शालेय विद्यार्थ्यांच्या चित्र प्रदर्शनाचेही आज उद्घाटन झाले.

कोणत्याही पर्यावरणीय प्रश्नांवर भाष्य करताना आणि विशिष्ट मुद्यांवरच, नेमकेपणाने बोलण्यात डॉ. चौधरी यांचा हातखंडा आहे. अर्थात 'विकास की पर्यावरण' या विषयावर बोलताना डॉ. चौधरी यांनी उपनिषदे, संत ज्ञानदेवांच्या ओव्यांतील संदर्भ देत भविष्यातील उपाययोजनांबाबतही विस्तृत विवेचन केले.

ते म्हणाले, "पर्यावरण ही भारताची संस्कृती असून विकास हा पर्यावरणाच्या पोटातीलच एक भाग आहे. फक्त त्याचा उद्देश आणि विकासातून उत्क्रांती की विनाश, या गोष्टींवर अधिक लक्ष द्यायला हवे. तसे होत नसल्यानेच केदारनाथचा महाप्रलय असो किंवा माळीणची घटना, या धोक्यांना सामोरे जावे लागले नसते."

शाश्वत विकास कसा असावा आणि तो कोणत्या दिशेने जावा, याबाबतही त्यांनी अभ्यासपूर्ण मांडणी केली. ते म्हणाले, "आपल्या राजकीय नेतृत्वाची दृष्टीच फ्लेक्सपुरती मर्यादित असल्याने पर्यावरणीय ऱ्हासाकडे संवेदनाहीन दृष्टीनेच पाहिले जाते. जैतापूर प्रकल्प होणारच. कारण हा सारा विकास टेंडरकेंद्री आहे. आपण विज्ञाननिष्ठ असल्याचा कितीही दावा केला जात असला तरी चित्र वेगळे आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक धरणे आणि त्याच महाराष्ट्रातील साडेचार लाख खेड्यांत अजूनही वीज नाही आणि साडेतीन लाख खेड्यांत पाणी नाही. गेल्या सहासष्ट वर्षांत आपण एकही ऊर्जा संशोधन संस्था का उभी केली नाही ?"

कार्यक्रमात सन्मती इंजिनिअरिंग वर्क्स, के अँड के फौंड्रीज, शिल्प एंटरप्रायजेस, पॅरागॉन फौंडर्स या आस्थापनांचा संवेदना पुरस्काराने गौरव झाला. यावेळी किर्लोस्कर ऑईल इंजिनचे आर. आर. देशपांडे, शंतनू धर, कृष्णा गावडे, प्रकाश राव, वीरेंद्र चित्राव, बाबूराव पेंटर फिल्म सोसायटीचे चंद्रकांत जोशी आदी उपस्थित होते. मनीष आपटे यांनी सूत्रसंचालन केले.



**कोल्हापूर : किर्लोस्कर वसुंधरा फिल्म फेस्टिव्हलला गुरुवारी दिमाखात प्रारंभ झाला. रोपाला पाणी घालून महोत्सवाचे उद्घाटन करताना आर. आर. देशपांडे, डॉ. विश्वंभर चौधरी. यावेळी डावीकडून वीरेंद्र चित्राव, प्रकाश राव, शंतनू धर, कृष्णा गावडे, चंद्रकांत जोशी.**

### आकर्षक मूर्ती

**स. म. लोहिया हायस्कूलमधील विद्यार्थी आणि कलाशिक्षक सागर बगाडे यांच्या संकल्पनेतून निर्माल्यातील विविध वस्तूंपासून पाच फुटी तिरुपती बालाजीची मूर्ती साकारली आहे. ही मूर्तीही आकर्षण आहे.**

* दै. सकाळ :- 19/09/2014